नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २९४ Issue - 294 | वार सोमवार दि. १६ मार्च २०२६ Blow- Monday Date 16 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांची तारीख जाहीर

दोन टप्प्यात होणार मतदान; ४ मे रोजी लागणार निकाल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : देशातील ५ राज्यात विधानसभा निवडणुकांचं रणशिंग फुंकलं जात असून केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत निवडणुकांची घोषणा केली. देशाचं लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालसह तामिळनाडू आसाम, पुदुचेरी आणि केरल राज्यात निवडणुका होत आहेत. केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली. विशेष म्हणजे या ५ राज्यांच्या निवडणुकांसह महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी मतदारसंघातील पोटनिवडणुकांचीही तारीख जाहीर करण्यात आलीय. त्यानुसार, प. बंगालमध्ये दोन टप्प्यात निवडणुका होत असून २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

माझ्या प्रिय मतदारांनो, गेल्या काही दिवसात निवडणूक आयोगाने सर्व राज्यांचा दौरा केला, तयारीचा आढावा घेतला. आयोगाने सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची भेट घेतली, त्यांच्या सूचनांचा स्वीकार केला. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, खऋ, उऋ यांची भेट घेतली. प्रशासनाने डखठ साठी केलेल्या कामगिरीबद्दल इङज चे अभिनंदन केल्याचं ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं. निवडणुका होत असलेले पाचही राज्य भौगोलिक आणि सांस्कृतिक भारताच्या विविधतेचं प्रतिनिधित्व करतात, असे म्हणत त्यांनी मतदारसंख्या आणि मतदान कर्मचारी, यंत्रणा याबाबत माहिती दिली.

आसाममध्ये सर्व १२५ मतदारसंघासात एकाच टप्प्यात, केरळमधील १४० विधानसभा आणि पदुचेरीतील ३० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. या तिन्ही राज्यात ९ एप्रिल रोजी मतदान आणि ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. तर, तामिळनाडूतील २३४ विधानसभेसाठी देखील एकाच टप्प्यात २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. मात्र, पश्चिम बंगालमध्ये २९४ विधानसभा मतदारसंघासाठी दोन टप्प्यात १५२ आणि १४२ मतदारसंघात अनुक्रमे २३ आणि २९ एप्रिल मतदान होणार आहे. या सर्व विधानसभा निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी लागणार आहेत.

देशात निवडणुका जाहीर करण्यात आलेल्या पाचही राज्यातील विधानसभांचा कार्यकाळ मे महिन्यात संपुष्टात येत आहे. गत २०२१ मध्ये या राज्यांमधील निवडणुकांची घोषणा २६ फेब्रुवारी रोजी करण्यात आली होती. त्यावेळी, प. बंगालमध्ये ८ टप्प्यांत निवडणुका झाल्या, आसाममध्ये ३ टप्पे तर तामिळनाडू, केरळ आणि पुदुचेरीमध्ये एकाच टप्प्यात मतदान झाले होते.

देशाच्या ५ राज्यातील मतदारांची संख्या एकूण १७.४ कोटी एवढी आहे, तर ८२४ एकूण विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदान प्रक्रियेसाठी एकूण मतदान केंद्रांची संख्या २.१९ लाख असून एकूण कर्मचारी २५ लाख कार्यरत आहेत, अशी माहितीही आयोगाने दिली.

नेपाळमध्ये भारतीय भाविकांची बस दरीत कोसळली, सात जणांचा मृत्यू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

काठमांडू: शनिवार सायंकाळी (१४ मार्च २०२६) नेपाळच्या गोरखा जिल्ह्यात एक दुर्दैवी रस्ता दुर्घटना घडली. मनकामना मंदिरात दर्शन घेऊन येत असलेल्या भारतीय भाविकांची एक बस अनियंत्रित होऊन खोल दरीत कोसळली. स्थानिक प्रशासनानुसार, ही घटना गोरखा जिल्हयाच्या शहीद लखन ग्रामपंचायतीच्या कांतार क्षेत्रात झाली. बस सुमारे १५० मीटर खाली एका दरीत कोसळली. शहीद लखन हे गाव काठमांडूच्या सुमारे १२० किलोमीटर पश्चिममध्ये स्थित आहे. जिथे अरुंद आणि वळणदार रस्त्यावर प्रवास करणे खूप धोकादायक मानले जाते.

पोलिसांच्या माहितीनुसार, या अपघातात ७ भारतीय भाविकांचा जागीच मृत्यू झाला. इतर जखमींना तत्काळ रुग्णवाहिकेद्वारे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.चितवन मेडिकल कॉलेज, भरतपुरमध्ये ७ भारतीय नागरिकांच्यावर उपचार चालू आहेत.

तसेच, बसचा स्थानिक चालक आणि त्याचा सहाय्यकही जखमी झाले आहेत, ज्यांचा उपचार चालू आहे. स्थानिक लोक आणि पोलिसांनी तत्काळ बचाव आणि मदतीचे काम सुरू केले.

गोरखा जिल्ह्यातील डीएसपी राज कुमार श्रेष्ठ यांच्या मते, बस एका उतारावर होती, त्यावेळी वळण घेत असताना घसरली. मात्र, अपघात ाचे नेमके कारण काय असू शकते याबद्दल तपास केला जात आहे. गोरखाचे मुख्य जिल्हा अधिकारी तुलसी बहादुर श्रेष्ठ यांनी सांगितले की,मंदिरामधून निघाल्यानंतर सर्व प्रवासी कुठे जात होते हे स्पष्ट झालेले नाही. ऑगस्ट २०२४ मध्ये भारतीय भाविकांना घेऊन जाणाऱ्या बसचा अंबुखैरेनी परिसरात अपघात झाला होता. ज्यामध्ये २७ जणांचा मृत्यू झाला होता.

नेपाळमध्ये पर्वतीय रस्त्यांची रचना आणि खराब रस्ता सुरक्षा व्यवस्थेमुळे सातत्याने अपघात घडत आहेत. अधिकृत आकडेवारीनुसार, नेपाळमध्ये रस्ते दुर्घटना झपाट्याने वाढत आहे. १० वर्षांपूर्वी रस्तादुर्घटनांची संख्या ४,९९९ नोंदवली गेली. २०२४-२५ या वर्षाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, एकूण ७,६६९ रस्ता दुर्घटना घडल्या आहेत, ज्यामध्ये १९० लोकांचे निधन झाले आहे. नेपाळमध्ये रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांपैकी ७० टक्क्यांहून अधिक हे पादचारी, सायकलस्वार आणि मोटारसायकलस्वार असतात.

धाराशिवमध्ये भीषण अपघात, तीन वाहनाची विचित्र धडक; तीन जणांचा मृत्यू, २ गंभीर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धाराशिव : राज्यातील रस्ते अपघातांची मालिका सुरू असल्याचं दिसून येत आहे. गेल्याच आठवड्यात लातूरमध्ये भीषण अपघातात ४ जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाचा आता धाराशिवम ध्येही भीषण अपघाताची घटना घडली. लातूर-तुळजापूर महामार्गावर अपघात घडून तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. पाटोदा येथील पुलावर तीन वाहनांची जोरदार धडक झाली. या धडकेत वाहनातील तिघांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत मतदकार्य सुरू केलं, तसेच पोलिसांनाही कळविण्यात आलं.

वाहनांची धडक इतकी तीव्र होती की, अपघातात तीन जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तसेच दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढण्यास मदत केली. तर, पोलिसांनीही माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेत पंचनामा करण्यास सुरुवात केली.

किनवटच्या इस्लापूरमध्ये अग्नीतांडव! भीषण आगीत चार ते पाच दुकाने जळून खाक, लाखोंचं साहित्य भस्मसात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

किनवट : किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील मुख्य मार्केट परिसरात रविवारी (दि. १४) मध्यरात्री भीषण आग लागून चार ते पाच दुकाने जळून खाक झाल्याची घटना घडली.

किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील मुख्य मार्केट परिसरात रविवारी (दि. १४) मध्यरात्री भीषण आग लागून चार ते पाच दुकाने जळून खाक झाल्याची घटना घडली. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री सुमारे साडेअकरा वाजताच्या सुमारास इस्लापूर मार्केटमधील एका दुकानातून अचानक धूर व ज्वाला उसळू लागल्या.

काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण करत शेजारील दुकानांनाही वेढा घातला. या आगीत हार्डवेअरचे दुकान, हॉटेल तसेच चपलांचे दुकान अशा एकूण चार ते पाच दुकाने जळून खाक झाली. आगीची माहिती वाऱ्यासारखी परिसरात पसरताच नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीची तीव्रता जास्त असल्याने आग आटोक्यात आणणे कठीण झाले. त्यामुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या आगीत संबंधित दुकानदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून लाखो रुपयांची मालमत्ता जळून खाक झाली आहे.

अवैध वाळू साठ्यासह २ टिपर, जेबीसी जप्त

देगाव येथे अवैध वाळु वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर :देगाव (ता.पंढरपूर) येथे देगाव ते बाभुळगाव जाणाऱ्या रोडवर यादव यांच्या वीट भट्टीजवळ करण्यात आलेल्या अवैध वाळूचा साठ्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी पथकाने कारवाई केली आहे. या कारवाईत दोन टिपर, एक जेसीबी व ८ ब्रास अवैध वाळू साठा दि. १४ रोजी जप्त करण्यात आला आहे.

सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे याना गोपनिय माहिती मिळाल्याने त्यांचे कार्यालयाकडील पोलीस पथकातील पोलीस अंमलदार हे देगाव येथे गेले. देगाव ते बाभुळगाव जाणारे रोडवर यादव यांच्या वीट भट्टीजवळ मोकळ्या जागेत वाळू साठा दिसून आला. वाळू जेसीबी मशीन च्या साह्याने दोन टिपर वाहनात भरत असल्याचे दिसून आले. तेव्हा टिप्पर आणि जेसीबी चालकास जागीच पकडण्यात आले. जेसीबी चालक प्रवीण नानासाहेब बोराटे (वय ३५) रा. मुंडेवाडी, ता. पंढरपूर तसेच टिपरचालक विश्वास हनुमंत चव्हाण (वय ४३) रा. सुस्ते ता. पंढरपूर, तर मालक बालाजी मारुती पवार रा. देगाव असे असल्याचे सांगितले. तर टिपर मालकाचे नाव विचारले असता त्यांनी सदरचे टिपर हे सोमनाथ जाधव रा. देगाव यांचे मालकीची असल्याचे सांगितले. दोन टिप्पर प्रत्येकी ४ ब्रास वाळू भरल्याचे दिसून आले. त्यापैकी एक टिपर क्र. (डब्ल्यू बी ५३ बी १४३०) व दुसरा टिपर क्र. (एम.एच. १३ डिक्यू २८५८) व बिगर क्रमांकाचा जेसीबी ताब्यात घेण्यात आला. यावेळी ८ ब्रास वाळू साठा मिळून आला. पो.उपनिरीक्षक भोसले यांनी ग्राम महसूल अधिकारी डी. बी. कोताळकर यांना बोलावून माहिती देऊन पुढील कारवाईकामी त्यांच्या ताब्यात वाळू साठयासह दिले आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भोसले, पोहेकॉ रोकडे, खिलारे, रोंगे, पोना शिंदे, पोकॉ हुलजंती लोंढे यांनी पार पाडली आहे.

आपल्या गावामध्ये अशा प्रकारचे अवैध धंदे चालु असल्यास आम्हास संपर्क करावा. यापुढे कोणी अशा प्रकारचे बेकादेशीर कृत्य अथवा अवैध धंदे सुरू ठेवील, अशा समाजविघातक लोकांवर प्रचलित कायदयानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल. तसेच अशा लोकांची यापुढे गय केली जाणार नाही, असा इशारा सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी दिला आहे.

बीड महिला अत्याचारप्रकरणाची दखल; पोलीस पाटील अन् ग्रामसेवकावरही गुन्हा दाखल करण्याचे निर्देश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बीड : राज्यात गेल्या काही दिवसांपासून कायम चर्चेत असलेल्या आणि गुन्हेगारी प्रकरणांनी गाजत असलेल्या बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अल्पवयीन महिलेस घरातून नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला आहे. याप्रकरणी, महिला आयोगाने दखल घेतली आहे.

बीड जिल्ह्यातील हिवरा पहाडी येथील महिला रात्री घरी झोपलेली असताना घरातून उचलून नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार करून रात्रभर गावच्या चावडीवर बांधून ठेवल्याची बातमी माध्यमातून समोर आली आहे. राज्य महिला आयोगाने याची दखल घेतली असून तपास अधिकाऱ्यांशी फोनवरुन संवाद साधला. आता, पीडित अल्पवयीन महिलेच्या विवाहावरुनही गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी प्रकरणाचे तपास अधिकारी अतुलकुमार लांडगे यांना दूरध्वनीवरून सूचना दिल्या आहेत. सद्यस्थितीत पीडित महिलेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम १३७(२),३३३,६४(२)(ळ) आणि पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी वैभव पटेकर याला अटक करण्यात आली आहे. या तपासा दरम्यान पीडित मुलीचा गेल्याच वर्षी बालविवाह लावून देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या बालविवाहाच्या दृष्टीनेही गुन्हा दाखल करून लग्न लावून देणारे, लग्नास उपस्थित असणारे, पोलीस पाटील, ग्रामसेवक अशा संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश आयोगाच्या अध्यक्षा अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी पोलीस प्रशासनाला दिले आहेत.

१० मार्च रोजी रात्रीच्या सुमारास पीडित महिला आपल्या पतीसोबत घरी झोपलेली होती. मध्यरात्रीच्या सुमारास आरोपी घरात शिरला. त्याने महिलेचे तोंड दाबून तिला जबरदस्तीने घराबाहेर नेले. त्यानंतर तिला गावाजवळ असलल्या नदीपात्रात नेत तिच्यावर अत्याचार केला असल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर आरोपीने पीडित महिलेला गावातील चावडीत आणून दोरीनं आणि कपड्यानं बांधून ठेवलं आणि तेथून पसार झाला. काही वेळानंतर शुद्धीवर आल्यानंतर पीडितेने मदतीसाठी आवाज दिला, मात्र सुरुवातीला तिला कोणीही मदत केली नाही. नंतर तिच्या नातेवाईकांना याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेत तिला तिथून सोडवून घरी नेलं. घटनेनंतर आरोपीच्या भीतीमुळे पीडितेने दोन दिवस हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र, शेवटी तिने हिम्मत करून आई आणि मामासोबत पिंपळनेर पोलिस ठाण्यात जाऊन याबाबत तक्रार दाखल केली. त्यानंतर, आरोपी वैभव पटेकर यास अटक करण्यात आली असून १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

संपादकीय....

मंदी अन् महागाई?

गेल्या काही महिन्यांपासून जगाला आधीच कठीण परिस्थितींचा सामना करावा लागत होता. विकासाचा वेग अत्यंत मंदावला होता आणि आता अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील तणावाने आगीत तेल ओतायचं काम केलं आहे. पश्चिम आशियातील युद्धाच्या प्रारंभापासून आर्थिक मंदीची भीती वाढली आहे. अमेरिका आणि इस्रायलकडून हल्ला केल्याच्या प्रत्युत्तरात इराणकडून आखाती देखील अमेरिकन तळांवर आक्रमक हल्ले केले जात आहे. यामध्ये गेल्या आठवड्यात सौदी अरेबियाच्या मालकीची जगातील सर्वात मोठी तेल रिफायनरी कंपनी, आरामकोवर हल्ला केला गेला तर नंतर इराणकडून होर्मुझवर नाकाबंदी केली गेली ज्यामुळे जगात खळबळ उडाली. यानंतर अलीकडेच अमेरिकेने इराणच्या सर्वात मोठ्या तेल साठ्यावर बॉम्ब टाकला ज्यामुळे परिस्थिती सुधारण्याऐवजी आणखी बिघडली. कच्च्या तेलाच्या दरवाढीने जगाचे टेन्शन वाढवले आहे. इराणमध्ये संघर्ष वाढल्यापासून तेलाच्या किमती भडकल्या. कच्च्या तेलाच्या दरातअचानक आणि तीव्र वाढीमुळे जागतिक शेअर बाजारांना जोरदार धक्का बसला, ज्याचा परिणाम अमेरिकेतील वॉल स्ट्रीटपासून ते दलाल स्ट्रीटपर्यंत सर्वत्र झाला. अमेरिका-इराण संघर्ष लवकरच शांत झाला नाही आणि तेलाच्या किमती पुन्हा कमी झाल्या नाहीत, तर अर्थव्यवस्थेसाठी 'ब्रेकिंग पॉइंट' ठरू शकते, असे तज्ञांचे म्हणणे आहे. अमेरिकन अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत सापडल्यास जगालाही आर्थिक संकटाला सामोरे जावे लागू शकते आणि भारतही याला अपवाद ठरणार नाही. कच्चे तेल असो, एलपीजी असो किंवा पीएनजी असो, भारत मोठ्या प्रमाणात ऊर्जा गरजांसाठी जगावर अवलंबून आहे. त्यामुळे येत्या काळात महागाईचा राक्षस आणखी डोकं वर काढू शकतो आणि मागणीवर थेट परिणाम होऊ शकतो. 'ब्रेंट क्रूड १२० डॉलर प्रति बॅरलवर पोहोचला म्हणजे आर्थिक वाढ शून्यावर पोहोचली आहे. हा आर्थिक मंदीच्या सुरुवातीचे संकेत देतो.' क्रूडच्या किमती १२- डॉलर्सपर्यंत पोहोचल्याने अर्थव्यवस्थेवरील दबाव वाढण्याचा इशारा दिला होता. क्रुगमन म्हणाले की केवळ वाढत्या तेलाच्या किमतींमुळे मोठी आर्थिक मंदी किंवा पूर्णपणे अनियंत्रित महागाई येईल अशी अपेक्षा नाही, पण सध्याच्या समष्टि आर्थिक परिस्थिती पाहता परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याचा इशारा आहे. युद्धाची परिस्थिती अशीच राहिल्यास येणारा काळ हा महागाईचा आणि मंदीचा असू शकतो, असे वाटते.

'अट्रॉसिटी' कायद्यात अटकेपासून मुभा ! पीडितांना न्याय की अन्यायाला अभय?

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
– एक विशेष विश्लेषण.

महाराष्ट्र भाजप सेना राष्ट्रवादी सरकारचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी अनुसूचित जाती जमाती अत्याचारास प्रतिबंध घालण्यासाठी केलेल्या अट्रॉसिटी कायद्यांतर्गत होणाऱ्या अटकेबाबत नुकतेच एक बेकायदा विधान केले आहे.तपास अधिकाऱ्याची (आय ओ) खात्री पटल्याशिवाय आरोपीला अटक होणार नाही, असा बदल सरकार करणार असल्याचे त्यांनी म्हटले.राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार शशिकांत शिंदे यांनी गुन्हा दाखल करण्यापूर्वी त्याची पडताळणी व्हावी मगच अटक करावी अशी मागणी विधानसभेत केली आहे. प्रश्न विचारताना शिंदे ह्यांचा ह्या कायद्या बाबत असलेला सरंजामी आकस आणि उत्तर देताना सिरसाठ ह्यांचा अनुसूचित जाती जमाती बाबतचा बायस दृष्टिकोन ह्या निमित्ताने महाराष्ट्रापुढे आला आहे.

सिरसाठ ह्यांचे विधान आणि शिंदेंचा प्रश्न एका बाजूला 'कायद्याचा दुरुपयोग' रोखण्याचा प्रयत्न वाटत असला, तरी दुसऱ्या बाजूला तो पीडितांच्या जखमेवर मीठ चोळणारा आणि गुन्हेगारांचे मनोबल वाढवणारा आहे. मुळात हा कायदा केंद्र सरकारने केलेला कायदा आहे.त्यात राज्य सरकार बदल करू शकत नाही.असाच प्रयत्न २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने केला होता.'प्राथमिक चौकशी' शिवाय अटक होणार नाही असा निकालच दिला होता, ज्यावर देशभर तीव्र पडसाद उमटले. त्यानंतर केंद्र सरकारने संसदेत दुरुस्ती करून कलम १८-ए समाविष्ट केले, ज्यानुसार अट्रॉसिटी गुन्ह्यात तत्काळ अटकेसाठी कोणाच्याही परवानगीची किंवा प्राथमिक चौकशीची गरज नाही.आता राज्य सरकार जर शिरसाट म्हणतात तसा बदल करू पाहत असेल, तर तो केंद्रीय कायद्याच्या आणि संसदेच्या अधिकारांच्या विरोधात जाणारा आहे.ह्यामुळे शरद पवारांची 'राष्ट्रवादी' किती 'कास्टवादी' आहे हे पुन्हा उघडकीस आले आहे.शिवाय नुसते जातीचे जनप्रतिनिधी असले म्हणजे वंचित समूहाला सुरक्षा आणि न्याय मिळेलच ह्याची खात्री नसते हे पुन्हा एकदा सिरसाठ ह्यांनी सिद्ध केले आहे.

अट्रॉसिटी कायद्यां मध्ये दाखल झालेल्या गुन्हे आणि अत्याचाराची भीषण आकडेवारी आहे.त्याही पेक्षा अनेक गुन्हे दाखल होतच नाहीत.अट्रॉसिटी कायद्यांतर्गत तक्रार दाखल करायला गेलेल्या अत्याचार पीडित खोटीच फिर्याद दाखल करीत आहेत अशी मानसिकताच पोलिस आणि प्रशासनाची झाली असल्याने देशात कुठेही सहजासहजी गुन्हाच दाखल करत नाही.केला तरी अत्याचार झालेल्या व्यक्ती विरुद्ध काउंटर केस दाखल करून त्याला चोरी दरोडा किंवा महिलेची छेडखानी ह्या गुन्ह्यात ठरवून अडकवले जाते.त्यामुळे खोटे गुन्हे दाखल होतात हा बनाव करून सरंजामी राजकीय पक्ष आणि नेत्यांनी हा कायदा अस्तित्वात आल्या पासून त्या विरुद्ध कोल्हेकुई सुरू ठेवली आहे.

तपास अधिकाऱ्याच्या 'खात्री'ची अट घालण्यापूर्वी, समाजातील जातीय अत्याचारांची वास्तव आकडेवारी पाहणे गरजेचे आहे.नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (छउठइ) च्या ताज्या अहवालानुसार देशातील दाखल असलेल्या गुन्ह्याची भीषण स्थिती आहे.भारतात दरवर्षी अनुसूचित जाती-जमातींवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होताना दिसत आहे.२०२३-२४ च्या आकडेवारीनुसार, देशात साधारण ५७,००० हून अधिक गुन्हे केवळ अनुसूचित जातींविरुद्ध (डउ) नोंदवले गेले.महाराष्ट्राची स्थिती काही वेगळी नाही.महाराष्ट्राचा क्रमांक दलित अत्याचाराच्या बाबतीत देशातील पहिल्या पाच-सहा राज्यांमध्ये लागतो. दरवर्षी राज्यात सुमारे २,५०० ते २,७०० अट्रॉसिटीचे गुन्हे दाखल होतात. ह्या कायद्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन पीडित अत्याचार झालेल्या व्यक्तीला अथवा समूहाला न्याय मिळेल असा नसल्याने 'निर्दोष' सुटण्याचे प्रमाण मोठे आहे. जिथे बौद्ध समाजाचे मंत्री संजय सिरसाठ, पूर्वी अट्रोसिटीचे गुन्हे सर्रास दाखल होत होते हे खरे आहे असे सभागृहात सांगत असतील तर इतरांची ह्या कायदा बद्दल आणि त्याचे अंमलबजावणी विषयी काय मानसिकता असेल हे सहज लक्षात येते.मुळात कायद्याच्या दुरुपयोगाचा तर्क देताना 'कमी शिक्षा दर' याचे कारण पुढे केले जाते.मात्र त्याचे भयावह वास्तव पोलिस समाज आणि प्रशासनाच्या बायस मानसिकतेत आहे.अट्रॉसिटी कायद्यांतर्गत नोंदवलेल्या गुन्ह्यांमध्ये आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण जेमतेम ३०% ते ३२% आहे.निर्दोष सुटण्याचे प्रमाण लॉिळींरश्र ठरींश सुमारे ६५% ते ७०% प्रकरणांमध्ये आरोपी निर्दोष सुटतात.हे का घडते? आरोपी निर्दोष सुटतात याचा अर्थ 'तक्रार खोटी होती' असा नेहमीच होत नाही. उलट, अनेकदा तपास अधिकाऱ्याने खजाणीवपूर्वक केलेला कुचकामी तपास, साक्षीदारांवर असलेला सामाजिक दबाव आणि आर्थिक ताकद यामुळे हे गुन्हे न्यायालयात टिकत नाहीत.उप विभागीय पोलिस अधिकारी ह्याने तपास करायचा असतो मात्र तपास करतो पी एस आय किंवा पी आय एस डी पी ओ हा नुसता सह्याजीराव असतो.हे अधिकारी प्रमोशन होऊन जात असल्याने न्यायालयात सहसा खटला सुरू असताना येतच नाही, किंवा आले तरी दाखल गुन्ह्यात शिक्षा व्हावी असा युक्तिवाद किंवा बाजू मांडत नाहीत. त्यामुळे शिक्षा होत नाही.

आता अटकेसाठी पुन्हा 'तपास अधिकाऱ्याची खात्री' ही अट घातली, तर पीडितांवर तडजोड करण्यासाठी दबाव वाढेल आणि तपास अधिकारीच 'न्यायाधीश' बनून आरोपींना वाचवण्याची शक्यता नाकारता येत नाही.पोलीस राजकीय दबावाखाली येतील जर तपास अधिकाऱ्याच्या खात्रीवर अटक अवलंबून असेल, तर स्थानिक राजकारण आणि जातीच्या प्रभावाखाली तपास अधिकारी गुन्हा 'फिल्टर' करतील.त्यातून कायद्याचा धाक संपेल.अट्रॉसिटी कायद्याचा मूळ उद्देशच जातीच्या आधारे होणाऱ्या हिंसेला जरब बसवणे हा आहे.अटकेची भीतीच राहिली नाही, तर पीडितांना गावात राहणे कठीण होईल.

त्यामुळे शिंदे आणि सिरसाठ दोघांचे वक्तव्य ही संविधानाच्या तत्त्वांच्या विरोधात आहेत.जर सरकारला कायद्याचा दुरुपयोग रोखायचा असेल, तर त्यांनी अनुसूचित जाती जमाती विरुद्ध खोट्या काउंटर तक्रारी करणाऱ्यांवर कारवाईचे कडक कायदे करावेत.'अटकेपूर्वी खात्री'चा घाट घालून संपूर्ण समाजाला असुरक्षिततेच्या छायेत ढकलणे, हे अनुसूचित जाती जमाती हक्कांची पायमल्ली करणारे आहे. अशा निर्णयामुळे न्यायालयात न्याय मिळण्यापूर्वीच 'खाकी वर्दी'च्या अधिकारात न्याय दडपला जाण्याचा धोका अधिक आहे.

'अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९' सुधारित अट्रोसिटी २०१५ मध्ये विविध प्रकारच्या अत्याचारांसाठी वेगवेगळी कलमे लावली जातात. या कायद्याचा मुख्य उद्देश केवळ शारीरिक हिंसा रोखणे हा नसून, सामाजिक अपमान आणि वंचना रोखणे हा देखील आहे.या कायद्यातील कलम ३ मध्ये गुन्ह्यांचे सविस्तर वर्गीकरण आहे. त्यात सामाजिक आणि आर्थिक बहिष्कार या कलमांतर्गत पीडित व्यक्तीला अखाद्य किंवा घृणास्पद पदार्थ खाण्यास भाग पाडणे. सार्वजनिक ठिकाणी जातीवाचक शिवीगाळ करणे किंवा सन्मानाला ठेच पोहोचवणे. वेठबिगारी किंवा मानवी प्रतिष्ठेला काळिमा फासणारी कामे करण्यास भाग पाडणे.अनुसूचित जाती जमातीच्या व्यक्तीला मतदान करण्यापासून रोखणे किंवा विशिष्ट उमेदवाराला मत देण्यासाठी दबाव टाकणे.अनुसूचित जाती किंवा जमातीच्या व्यक्तीच्या मालकीची जमीन चुकीच्या पद्धतीने ताब्यात घेणे किंवा त्यावर शेती करणे.सार्वजनिक पाण्याचे स्रोत विहीर, नळ वापरण्यास मनाई करणे किंवा ते दूषित करणे.अनुसूचित जाती किंवा जमातीच्या महिलेचा विनयभंग करणे, तिच्याशी गैरवर्तन करणे किंवा तिच्या संमतीशिवाय तिला स्पर्श करणे.

भारतीय न्याय संहिता किंवा जुन्या इंडियन पीनल कोड मधील गुन्हे अट्रॉसिटी कायद्यासोबत जोडले जातात.त्यात खोटी साक्ष देणे.एखाद्याला फाशीची शिक्षा व्हावी या हेतूने खोटी साक्ष दिल्यास जन्मठेपेची तरतूद आहे.पीडिताचे घर किंवा मालमत्ता आगीने नष्ट केल्यास जन्मठेपेपर्यंत शिक्षा होऊ शकते.हत्या किंवा गंभीर दुखापत ह्यात भारतीय न्याय संहितेच्या कलमांसोबत अट्रॉसिटीची कलमे लागल्यास शिक्षा अधिक कठोर होते.मात्र कागदावर हे कितीही कलमे दिसली तरीही प्रत्यक्षात गुन्हा दाखल करताना ही कलमे लावलीच जात नाही.सर्रास लावली जाणारी कलमे आहे.जातीवरून शिवीगाळ आणि अपमान केल्याची जुने कलम ३(१)(१०) हेच लावले जात होते.फिर्याद कितीही गंभीर असू द्या.न्यायालये देखील इतकी बायस आहेत की फिर्यादी किंवा आरोपीची जात तक्रारीत नमूद नाही ह्या कारणासाठी १० हजार पेक्षा अधिक एफआयआर रद्द केले होते.जरी उच्च न्यायालयाने तांत्रिक कारणास्तव केसेस रद्द केल्या असल्या, तरी नंतरच्या काही निकालांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, केवळ एफआयआरमध्ये जातीचा उल्लेख नाही म्हणून संपूर्ण केस रद्द करता येणार नाही, जर तपासादरम्यान जातीचे पुरावे समोर आले असतील तरी गुन्हा होतोच.

थोडक्यात काय तर पोलिसांच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे आणि 'जातीचा उल्लेख' न केल्यामुळे शेकडो आरोपींना कायदेशीर पळवाट मिळाली, होती हे देखील ह्या राज्याने पाहिले आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे कलम ४ कर्तव्यात कसूर केली म्हणून तपास अधिकारी ह्याच्यावर कार्यवाही साठी कलम ४ ची तरतुद आहे.त्यानुसार जर एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने जो अनुसूचित जाती जमातीचा नाही या कायद्याची अंमलबजावणी करण्यात जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, तर त्याला ६ महिने ते १ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते.मात्र संपूर्ण देशात एकही अधिकारी ह्या गुन्हा मध्ये आरोपी सिद्ध झालेला नाही.हे देखील सर्वात भयंकर वास्तव आहे.

ज्या कलम १८-ए अटकेची तरतूद बद्दल सिरसाठ आणि शिंदे सभागृहात बोलले तो हा बदल २०१८ मध्ये झाला आहे. त्यानुसार, गुन्हा दाखल झाल्यावर आरोपीला अटक करण्यासाठी कोणत्याही पूर्वपरवानगीची किंवा प्राथमिक चौकशीची गरज नाही.राष्ट्रवादी आणि शिंदे सेनेला काहीही वाटले तरी ते ही तरतूद बदलू शकत नाही.

तसेच, आरोपीला अटकपूर्व जामीन मिळत नाही.असे कायद्यात नमूद असले तरी अनेक जिल्हा न्यायालयच आरोपींना अटक पूर्व जामीन मंजूर करत आहेत.

ह्या कायद्याची कठोर आणि प्रभावी अंमलबजावणी कशी होईल याची काळजी ना रामदास आठवले ह्यांना आहे ना संजय सिरसाठ ह्यांना आहे.कारण मुख्यमंत्र्याचे अध्यक्षते खालील हाय पावर दक्षता समिती देखील गेली अनेक वर्षे राज्यात तयार झाली नाही.हा कायदा कागदावर प्रभावी असला तरी ह्याला जेवढा धोका जातीयवादी प्रवृत्ती कडून आहे तेवढाच आठवले सिरसाठ सारख्या बौद्ध जनप्रतिनिधी कडून आहे

– राजेंद्र पातोडे
प्रदेश महासचिव
वंचित बहुजन युवा आघाडी महाराष्ट्र प्रदेश.
९४२२१६०१०१.

भारतीय दलित पँथर चे लढाऊ नेते प्रा. अरुण कृष्णाजी कांबळे



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
(उर्वरीत लेख)

मराठवाड्यातील भीषण अत्याचारानंतर मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाचे स्वरूप बदलले. ते समतेचे लोकशाहीचे प्रतीक बनले. समतावादी दलितेतर त्यात मोठया प्रमाणात सामील झाले. प्रा. म. भि. चिटणीस, डॉ. बाबा आढाव, कॉ. शरद पाटील, अंकुश भालेकर, बाबा दळवी, बापूराव जगताप आदींनी या आंदोलनात सहभागी होऊन आंदोलनाची कक्षा व्यापक केली. मराठवाडयापुरती 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर विद्यार्थी-नागरिक कृती समिती' याअगोदरच स्थापन झाली होती. ज्येष्ठ आंबेडकरवादी प्राचार्य म. भि. चिटणीस या समितीचे अध्यक्ष होते. त्यांचे नेतृत्व लाभल्यामुळे या समितीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. एस. एम. जोशी, कॉ. चंद्रगुप्त चौधरी, बाबा दळवी, अहिल्या रांगणेकर आदी समाजवादी, साम्यवादी व डाव्या चळवळीतील नेत्यांनीही आता जनप्रबोधनाला सुरूवात केली होती. नामांतर आंदोलनात मराठवाडयातील दलितांच्या घरादारांची राख झाली, पण फिनिक्स पक्ष्याप्रमाणे नवी समतावादी विचारांची पिढी उभी राहिली व समतेचे आंदोलन कितीतरी पुढे गेले. अंकुश भालेकर, बापूराव जगताप, फ. मुं. शिंदे, बा. ह. कल्याणकर, जवाहर राठोड आदी समतावादी तरूणांची नवी फौज लढण्यासाठी सिद्ध झाली. आणि मग आम्ही सर्वांनी मिळून ६ डिसेंबर १९७९ ला मराठवाडा विद्यापीठ नामांतर सत्याग्रह जाहीर केला. दलित पँथर, मराठवाडा विद्यापीठ नामांतर विद्यार्थी नागरिक कृती समिती, इतर संघटना यांनी सत्याग्रहाची हाक दिली आणि अक्षरश: लाखो लोक औरंगाबादला सत्याग्रहासाठी एकत्र आले. येत असताना लाखोंना वाटेत अटक झाली. औरंगाबाद शहराला युद्धछावणीचे स्वरूप प्राप्त झाले. अटक सत्र जोरात सुरू होते. मी वेषांतर करून औरंगाबाद शहरात पोहोचलो आणि आंदोलनाचे नेतृत्व केले. भडकल गेट आणि क्रांती चौक माणसांनी फुलून गेला होता. आम्हाला अटक करून 'हर्सूल जेल' मध्ये आणले. जेलचे स्वरूप पालटून गेले. मी तुरूंगाच्या बाहेर येऊन पत्रकारपरिषद घेतली आणि परत तुरुंगात सामील झालो. स्वातंत्र्योत्तर काळातील समतेच्या आंदोलनातील ६ डिसेंबर ७९ चा नामांतर सत्याग्रह हे तेजस्वी पर्व आहे. संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर लाखो कार्यकर्ते या आंदोलनात सामील होऊन ठिकठिकाणी तुरूंगात गेले. सगळे समतावादी, भटके-विमुक्त, सर्व जाती-जमातींतील दलित, जातीच्या-धर्माच्या-पक्षाच्या भिंती भेदून या आंदोलनात सामील झाले. नामांतर आंदोलनाने समतेच्या चळवळीत अपूर्व इतिहास निर्माण केला. न भूतो असा ! या चळवळीचे नेतृत्व करण्याचे भाग्य मला लाभले याबद्दल मी स्वत:ला धन्य समजतो. वस्तुत: नामांतर आंदोलनात सहभागी झालेल्या लाखो कार्यकर्त्यांना, ज्यांची घरेदारे जळाली त्या दलित बन्धुभगिनींना, जे धारातीर्थी पतन पावले त्या भीमवीरांना ते श्रेय जाते. मी केवळ नेतृत्वाचा निमित्तमात्र धनी झालो.

या सत्याग्रहासाठी लाखो वाटांनी येत असताना माझे सहकारी मित्र बाबा आढाव, मोहन धारिया, जोगेन्द्र कवाडे रामदास आठवले, हुसेन दलवाई यांना वाटेत अटक झाली आणि वेगवेगळया तुरूंगात भरती केले गेले. समुद्राला उधाण आले.

दु:खाची बाब म्हणजे या सत्याग्रहात रा. सु. गवई, बॅ. खोब्रागडे, प्रकाश आंबेडकर, राजा ढाले, नामदेव ढसाळ आदी दलित नेते सहभागी झाले नाहीत याचे शल्य कायम राहिले.

नामांतराच्या प्रश्नावर संपूर्ण महाराष्ट्रात हजारो मोर्चे निघाले. मुंबईत मंत्रालयावर निघालेले काही मोर्चे फारच प्रचंड होते. सत्याग्रह, जेलभरो आंदोलन, रास्ता रोको आंदोलन, उपोषणे हे मार्ग लोक सर्वत्र अवलंबित होते. या आंदोलनाचे नेतृत्व अर्थातच दलित पँथरकडे होते. आमची जबाबदारी वाढली होती. रात्रंदिवस सभा, संमेलने, मेळावे, परिषदा असे कार्यक्रम होत होते. महाराष्ट्रात विशेषत: मराठवाडयात कार्यक्रमाची गर्दी असे. कार्यकर्ते अतिउत्साहात कार्यक्रम ठेवीत. अनेकदा न विचारता, निश्चिती न करता कार्यक्रम ठेवले जात व नंतर गळझटीला येत. काहीही करा पण कार्यक्रमाला चला. आमच्या इज्जतीचा प्रश्न आहे, लोकांसमोर जाता येणार नाही, वर्गणी गोळा केलेली आहे वगैरे. आमची ख्याती वेगळीच असे. दौर्यावर जाण्यासाठी पैसे नसत, ऐनवेळी कसेतरी पैसे गोळा करून जावे लागे. चालत्या गाडीत चढावे लागे. आरक्षण नसल्यामुळे रात्ररात्र जागरण करावे लागे. उभे राहून प्रवास करावा लागे. लागोपाठ जागरण व प्रवास यामुळे प्रकृतीवर परिणाम होई. कार्यक्रमांवरही त्याचा परिणाम होत असे. कार्यक्रमांना मात्र लोकांची तुफान गर्दी होई. लोक आमची तासन् तास वाट पाहत असत. कार्यक्रमांना हारांचे ढीग पडत असत. पण पोटात अन्न नसल्यामुळे भाषणाच्या वेळी बोलणे अवघड जाई. आवाजही बसलेला असे. कार्यकर्त्यांचाही यात काही दोष नसे. ते कार्यक्रमाच्या तयारीसाठी त्रास घेत. नंतर आमची वाट पाहात. सगळया गाडया धुंडाळत बसत. आम्ही डब्यातून धडपडत उठत बाहेर आलो की, कार्यकर्ते घोषणा देत आमची मिरवणूक काढत. आधीच कार्यक्रमाला वेळ झालेला असल्यामुळे जेवणखाण करण्याचा प्रश्नच नसे. रात्री सभा उशिरा संपे. मग दोन-तीन वाजता डुलक्या घेत घेत जेवण होई. नंतर कार्यकर्त्यांशी चर्चा, झोप किंवा लगेच पुढच्या गावचा कार्यक्रम. कधीकधी विनातिकिट सुद्धा प्रवास करणे भाग पडे. या सगळया चक्रातून जात असताना मला माझी प्राध्यापकाची नोकरीही सांभाळावी लागत असे, कारण ती माझी हक्काची भाकरी आणि स्वाभिमानाची चाकरी होती. इतरांची गत तर आणखीनच वाईट होती.

या सगळयाचा परिणाम म्हणून मी आजारी पडलो, क्षयाची बाधा झाली काय असे वाटण्याइतपत प्रकृती बिघडली. इंजेक्शनचा कोर्स घेतला आणि पुन्हा कामाला लागलो. उसंत घ्यायला वेळ नव्हता. त्यातच मुख्यमंत्र्याच्या बैठकी, अत्याचारग्रस्तांची गार्हाणी, मदतीसाठी अर्ज वगैरे. नेतृत्वाचा मुकूट डोक्यावर होता. काटे बाकीच्यांना दिसत नव्हते. अनेकदा प्रश्न पडे, आपण राजा आहोत की पोतराजा! पण सभा, संमेलने गर्दी यांच्या धुमश्चक्रीत एवढा विचार करायला वेळ कुठला? लोकांचे प्रेम तर अपरंपार. ओवाळण्यासाठी आया-बहिणींच्या रांगा. आम्हाला अमान्य असले तरी सहन करावे लागे. चहा प्यायला जाणे हा एक कार्यक्रमच असे. सगळयांच्या घरी जावे लागे. मी तर चहाही न पिणारा. त्यामुळे मला नुसतेच जाऊन बसावे लागे. परंतु लोकेच्छेचा आदर करावा लागे. त्यांचे प्रेम तर असे की, त्यांच्या कथांचा संग्रहच करावा लागेल. जगातील फार थोडया नेत्यांच्या वाट्याला असे प्रेम आले असेल. माझ्या अठरा विश्व दरिद्री समाजाने असे प्रेम मला-आम्हाला दिले की, त्याची उतराई कधीही करता येणार नाही. प्रेमाची नशा आम्हालाही चढत असे. त्याचमुळे असेल, मी मान कधीही खाली झुकवली नाही. बाणा ताठ राहिला. मोडलो पण वाकलो नाही. नामांतराच्या प्रश्नावर कोणतीही तडजोड स्वीकारली नाही. दिल्लीहून पंतप्रधानांपासून निरोप आले. पण आमिषाला बळी पडलो नाही. हा स्वाभिमान कोठून आला? ही सूर्यशक्ती कोठून मिळाली, याचा आज विचार करतो तेव्हा समजते, हे बळ बाबासाहेबांच्या विचारांपासून, त्यांच्या व्यक्तिमत्वापासून मिळाले आणि त्याला पीळ बसला तो माझ्या अर्धपोटी, नागडया- उघडया बांधवांच्या प्रेमाचा. त्यांची ही निष्ठा, प्रेम, भाबडेपणा आमच्यातील प्रामाणिकपणाला कारणीभूत ठरले. भ्रष्टाचार जाळून टाकण्याचे सामर्थ्य त्यात होते. त्यामुळे आम्ही अधिकच प्रदीप्त झालो.

मराठवाड्यातील हिंसाचारानंतर पंतप्रधान व सर्वपक्षीय नेत्यांना यासंबंधीची माहिती देण्यासाठी मी स्वत: दिल्लीला गेलो. तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या भेटीचा सविस्तर वृत्तांत मी अन्यत्र कथन केला आहे. तो गंमतीदार आहे. श्रीमती इंदिरा गांधी त्यावेळी विरोधी पक्षनेत्या होत्या. त्यांनी आमची चांगली विचारपूस केली. आगतस्वागत केले व मराठवाड्याचा दौरा करण्याची इच्छाही व्यक्त केली. बाबू जगजीवनराम हे त्यावेळचे पंतप्रधानकी गमावलेले दलित नेते. बाबूजींनी त्यावेळी असे उद्गार काढले, 'आप लढो, हम सत्तामें रहेंगे '. यशवंतरावांचा अनुभव फारच वेगळा आला. मी दिल्लीत गेलो की यशवंतरावांना अवश्य भेटत असे. यशवंतरावांनी नेहमीच्या पद्धतीने माझे स्वागत केले. साहित्यिक घडामोडींसंबंधी चर्चाही केली. मराठवाड्यातील हिंसाचाराबद्दल बोलणे सुरू झाले तेव्हा अत्याचारग्रस्तांच्या मुलाखती असलेली ध्वनिफित मी त्यांना ऐकवली. दलितांच्या मदतीला धावून जाणार्या नांदेडच्या महाजन पाटलाची हकीकत ऐकून यशवंतराव भारावले. त्यांच्या डोळयातून अश्रूधारा वाहिल्या. माझा हात धरून ते म्हणाले, 'आमचीही स्थिती महाजन पाटलांसारखी आहे. मराठवाड्यातील लोक माझेही ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत.' यशवंतरावांचे ते पाणावलेले डोळे आजही माझ्या डोळयांसमोर दिसताहेत.

एक प्रसंग आठवतो. नामांतराच्या आंदोलनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्र्यांनी नागपूरला एक बैठक बोलावली. बैठकीला दोन्ही बाजूंचे प्रतिनिधी उपस्थित राहिले. मी बोलायला उभा राहिलो. मुख्यमंत्र्यांचे म्हणणे होते, आम्हाला थोडा वेळ द्या. नामांतर करतो. आम्ही वेळ द्यायला तयार नव्हतो. लोकशाही प्रथेप्रमाणे ठरावाची अंमलबजावणी आताच करा, अन्यथा ती होणार नाही अशी भूमिका आम्ही घेतली होती. स्वत: अण्णा-एस.एम. जोशी मला म्हणाले, 'अरुण, शरदला थोडा वेळ देऊ, त्याच्या मनात नामांतराचे आहे.' मी बधलो नाही. अखेर मुख्यमंत्री शरद पवारांनी मला स्वत: चिठ्ठी पाठवली. त्यावर त्यांनी आपल्या हस्ताक्षरात लिहिले होते... अमुकअमुक तारखेपर्यंत नामांतर करतो. तोपर्यंत आंदोलन करू नका. मला वेळ द्या.

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री मला, फाटक्या माणसाला हस्ताक्षरात पत्र लिहून वेळ द्या, असे म्हणतो हे सामर्थ्य आंदोलनातून निर्माण झाले. (मुख्यमंत्र्यांनी पत्रात दिलेल्या तारखेच्या तीन दिवस अगोदर त्यांचे सरकार बरखास्त झाले व नामांतराचे भिजत घोंगडे तसेच राहिले हे अलाहिदा!)

अशा आंदोलनाचा मला अभिमान वाटतो हीच माझी कमाई! हीच दौलत! यापुढे कोणत्याही पदाची मला कधीच किंमत वाटली नाही. पुढेही वाटणार नाही.

– प्रा. अरुण कांबळे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

महसूल समाधान शिबिरातून नागरिकांना मिळाला दिलासा : आ. दिलीप बनकर

पालखेड येथे शेकडो प्रकरणांचा जागीच निपटारा; महसुली सेवांचा गावागावात झाला लाभ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' अभियानांतर्गत निफाड तालुक्यातील पालखेड मंडळात आयोजित शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शनिवार (दि. १४ मार्च) रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये शेकडो प्रलंबित महसुली प्रकरणांचा जागीच निपटारा करत विविध शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला.

आ.दिलीप बनकर म्हणाले, महसूल समाधान शिबिराच्या माध्यमातून शासनाच्या सेवा थेट नागरिकांच्या दारी पोहोचत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी व सर्वसामान्यांना छोट्या-मोठ्या महसुली कामांसाठी कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी अशा शिबिरांची मोठी गरज आहे. या उपक्रमामुळे अनेक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा होत असून नागरिकांना मोठा दिलासा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

निफाडचे प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विशाल नाईकवाडे व मंडळ अधिकारी ज्ञानेश्वर केसरे यांच्या नियोजनातून हे शिबिर पार पडले. पालखेड, दावचवाडी, लोणवाडी, कारसुळ, नारायण टेंभी, आहेरगाव, पाचोरेवणी, शिरवाडे वणी, गोरठाण व वावी या गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध सेवांचा लाभ घेतला.

शिबिरामध्ये भोगवटादार वर्ग-२ मधील जमिनी वर्ग-१ करण्यात आलेल्या प्रकरणांतील दुरुस्त ७/१२ उतारे वितरित करण्यात आले. तसेच ७/१२ वरील पोटखराबा क्षेत्राचे लागवडीयोग्य क्षेत्रात रूपांतर करून सुधारित उतारे देण्यात आले. हेल्पडेस्कच्या माध्यमातून ७/१२ वरील विविध त्रुटी दुरुस्त करून सुधारित उतारे तात्काळ नागरिकांना देण्यात आले. 'जिवंत ७/१२' मोहिमेअंतर्गत आवश्यक नोंदी पूर्ण करण्यात आल्या.

यासोबतच सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करण्यात आले, तर 'सर्वांसाठी घर' योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी पट्टे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना आवश्यक विविध दाखले तसेच लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शेतकरी हिताच्या दृष्टीने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या प्रशासकीय मान्यता आदेशांचे वितरण करण्यात आले. ई-मोजणी, ग्रीस्टॅक व पीएम किसान योजनेशी संबंधित तक्रारींचेही निवारण करण्यात आले.

या शिबिरामुळे नागरिकांना तहसील कार्यालयात जाण्याची गरज कमी झाली असून प्रशासनाविषयी विश्वास वाढत असल्याची भावना उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली.

मंगळवेढा नारीशक्तीचा जल्लोष! लोकमंगल बँकेचे 'नारीशक्ती पुरस्कार' सोहळा उत्साहात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या कर्तुत्वाचा सन्मान करण्यासाठी लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड. सोलापूर शाखा मंगळवेढा यांच्या वतीने आयोजित नारीशक्ती पुरस्कार सोहळामोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. शुक्रवार दिनांक १३ मार्च रोजी ढगे डिजिटल हॉल, मंगळवेढा येथे हा सोहळा पार पडला व कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष सौ. सुनंदा (अबी) बबनराव अवताडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सौ अंजलीताई समाधान आवताडे होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ दिपाली ताड, सौ विजया घोंगे, सौ जयश्री कौचाळे, सो मोहिनी गण पाटील, सौ सीमा बुरजे, सौ उज्वला तळेकर तसेच यूपीएससी परीक्षेत देशात ४९३ वा क्रमांक मिळवणार मनोज रामचंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक नेते संजय खेडेकर यांनी केले या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रात होईल. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये आरती कनेरी विजया वाकडे आशाताई नागणे ,सुलोचना जानकर, सुलोचना इंगळे, दया वाकडे, मंगल बनसोडे सुजाता क्षीरसागर सानिया तांबोळी रूपाली दत्तू, अर्चना लोखंडे लीलावती धायगोंडे वंदना निकम कांचन तन गावडे गोविंदा चांदोले आणि शरीर सावजी यांचा समावेश होता महिलांनी क्रीडा कला सेवा साहित्य शिक्षण उद्योगाची विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करून त्यांना प्रोत्साहनपद देण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश होता या सोहळ्यामध्ये महिलांच्या कर्तुत्वाला उजळणा मिळाला असून समाजातील इतर महिलांसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले यावेळी आरोग्य शिक्षण आणि स्वावलंबन या त्रिसूत्रीवर भर देत महिलांनी आता केवळ उंबरठा ओलांडण्यापुरतेच न राहता यशाची शिखर गाठण्याचा निर्धार करावा अशी संदेश उपस्थित मान्यवरांनी दिले व कार्यक्रमाची तालुक्यात महिलांची मोठ्या संख्येने उपस्थित होते व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौभारती धनवे मॅडम यांनी केले हा सोहळा स्त्रीशक्तीच्या पेरणीचा सन्मानाचा उच्चार ठरला.

दादरच्या राज्यस्तरीय काव्य संमेलनात प्रा. अश्विनी काळे यांचा 'काव्यरत्न मानगिरी' पुरस्काराने गौरव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा' आयोजित राज्यस्तरीय त्रिवेणी मराठी काव्य संमेलन दादर येथील विद्याधर हॉलमध्ये उत्साहात संपन्न झाले. या सोहळ्यात अखिल महाराष्ट्र पत्रकार व पत्रलेखन संघातर्फे प्राध्यापिका अश्विनी शिवाजी काळे यांना त्यांच्या उल्लेखनीय काव्यसेवेबद्दल 'काव्यरत्न मानगिरी सन्मान चिन्ह' देऊन गौरविण्यात आले.

दिग्गजांची उपस्थिती

या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी माननीय श्री. अशोक नायगावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे सदस्य माननीय श्री. चंद्रशेखर गोखले, जागतिक महिला दिनाच्या विशेष पुरस्कार मानकरी डॉ. जयलक्ष्मीराव सानीपिना, विश्वात्मक मराठी साहित्य कट्ट्याच्या अध्यक्षा माननीय हेमलता गीते आणि उपाध्यक्ष माननीय जय गोरे आदि मान्यवर उपस्थित होते.

साहित्यिक माहोल

रविवार, ८ मार्च २०२६ रोजी दादर (पश्चिम) येथील शिवाजी पार्क परिसरातील चैत्यभूमीजवळ असलेल्या विद्याधर हॉलमध्ये हे संमेलन पार पडले. महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात राज्यभरातून अनेक कवी आणि साहित्यिकांनी सहभाग नोंदवला होता. अशोक नायगावकर आणि चंद्रशेखर गोखले यांनी आपल्या मनोगतातून मराठी साहित्यातील बदलत्या प्रवाहावर प्रकाश टाकला.

अश्विनी काळे यांच्या कार्याचा गौरव

प्रा. अश्विनी काळे यांच्या काव्य लेखनातील सातत्य आणि दर्जाची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या गौरवाबद्दल त्यांचे शैक्षणिक व साहित्यिक स्तरातून अभिनंदन होत आहे. संमेलनाचे यशस्वी आयोजन हेमलता गीते आणि जय गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

ठळक वैशिष्ट्ये:

- आयोजक: विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा व अखिल महाराष्ट्र पत्रकार संघ.
- स्थळ: विद्याधर हॉल, दादरच (मुंबई).
- प्रमुख पाहुणे: अशोक नायगावकर, चंद्रशेखर गोखले.
- निमित्त: जागतिक महिला दिन व राज्यस्तरीय काव्य संमेलन.

ज्योतिर्मय योग आणि निसर्गोपचार केंद्र यांच्या वतीने जागतिक महिला दीन उत्साहात साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील ज्योतिर्मय योग व निसर्गोपचार केंद्राच्या वतीने योग भवन येथे मंगळवार दि.१०रोजी संध्याकाळी अतिशय उत्साही वातावरणामध्ये जागतिक महिला दिन साजरा उत्साहात करण्यात आला.

यावेळी ज्योतिर्मय योगाच्या योगसाधिकांनी टाळ दिंडी काढून यामध्ये पांडुरंग रुक्मिणी प्रत्यक्ष उभी करून भक्तिमय वातावरण निर्माण केले भक्ती योग दाखवून दिला.

त्यानंतर अनेक योगा साधिकांनी विविध गुणदर्शन करून यामध्ये देशभक्तीपर गीतांवर ती नृत्य केले त्याचबरोबर उत्तम प्रकारचं भारुड सादर केलं रोडगा वाहीन तुला या माध्यमातून संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांनी समाज प्रबोधन केले असं या भारुडातून सर्वांना संदेश दिला

विविध राज्यांच्या राज्यातील विविध परंपरा व वेशभूषा परिधान करून भारतातील एकात्मतेचे दर्शन या नृत्यातून घडवून दिले तसेच योगा डान्स मराठमोळ्या लावणी सादरीकरण या निमित्ताने महिलांनी केलं

लावणी सम्राट श्री हरी बारंगुळे उर्फ हर्षदा पाटील यांनी लावणी सादर करून महिलांना देखील नाचण्यास भाग पाडले आणि प्रचंड उत्साह आणि आनंदी वातावरण आपल्या नृत्य आणि अदाकारीने सर्व महिलांना भुरळ घातली .

या लावणी नृत्यांगणे सोबत महिलांनी देखील अदाकारी केली आणि त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता प्रचंड गर्दी या कार्यक्रमासाठी होती सर्व महिलांना एक उत्तम प्रकारचे व्यासपीठ या निमित्ताने मिळालेलं होतं.

या कार्यक्रमाचे आयोजन ज्योतिर्मय योग व निसर्गोपचार केंद्र अध्यक्षा सौ ज्योती शेटे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

अक्कलकोट शहरातील मुस्लिम कब्रस्तान येथील कबरीची अज्ञातांकडून तोडफोड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट: अक्कलकोट शहरातील मुस्लिम कब्रस्तान येथील कबरीची अज्ञातांकडून तोडफोड करून धार्मिक भावना दुखावल्याबद्दल अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन त्या समाजकंटकावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे साहेब यांना निवेदन देण्यात आले.

सदर व्यक्तीने मुस्लिम कब्रस्तानातील अनेक कबरी वरील फरशी तोडल्या व कबरी वरील मृत व्यक्तींची नावे व धार्मिक मजकूर असलेल्या लेखन उध्वस्त केले, तसेच धार्मिक दृष्ट्या पवित्र असलेल्या जागेची जाणीवपूर्वक विटंबना केली हे कृत्य केवळ मालमत्तेचे नुकसान नसून मुस्लिम समाजाच्या धार्मिक श्रद्धा भावना व पवित्रतेवर थेट व गंभीर आघात करणारे आहे अशा प्रकारच्या कृत्यामुळे समाजात धार्मिक तेढ,भीती,असंतोष व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची पूर्ण शक्यता आहे.

अक्कलकोट पोलीस निरीक्षक दीपक भिताडे साहेब आपणास विनंती आहे त्या अज्ञात समाजकंटक दोषी व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी भविष्यात अशा घटना घडू नये त्यासाठी योग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

या वेळी मोहसीन मोकाशी, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास, सैपन शेख, स्कलेन सुभेदार, अबुबकर उस्ताद, सिकंदर चाऊस आदी उपस्थित.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून नागरिकांचे समाधान

महसूल विभागाकडून पुळुज व भाळवणी मंडळात १५०५ दाखले सेवांचे वितरण : तहसीलदार लंगुटे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे राबविण्यात येत आहे. या अभियानातंर्गत आज दिनांक १४ रोजी पंढरपूर तालुक्यातील पुळुज व भाळवणी या मंडळातून १ हजार ५०५ विविध सेवा व विविध दाखले देण्यात आले असल्याची माहित तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

या अभियानातंर्गत पुळुज व भाळवणी येथील शिबिरात निकाली काढण्यात आलेले फेरफार २११, सातबारा मधील दुरुस्ती ४४, डिजिटल सातबारा २८८, ८ अ उतारे १९६, विविध दाखले ५६२, प्रमाणपत्रे ४१८, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज १४, भूसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आलेली प्रकरणे १०, सामाजिक योजना २३, शिधापत्रिका १३३, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना ५४, आभा कार्ड एच.बी, तपासणी व औषधोपचार ७९, ई- मोजणी फेरफार नकाशा ३५,आदी सेवा व दाखले देण्यात आले.

यामध्ये पुळुज मंडळातून ७५० तर करकंब मंडळातून ७५५ असे एकूण १ हजार ५०५ विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात आल्याचे तहसीलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

यानंतर शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी खर्डी, पटवर्धन कुरोली, शुक्रवार दि. १७ एप्रिल रोजी भंडीशेगाव, रोपळे शुक्रवार दि. ८ मे रोजी पंढरपूर तर शुक्रवार दि. १५ मे रोजी तुंगत चळे या मंडळात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी पंढरपूर तालुक्यातील संबधीत मंडळातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महाराजस्व समाधान शिबिर मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार लंगुटे यांनी केले आहे. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, नायब तहसीलदार वैभव बुचके, दीपक शिंदे, दुय्यम निबंधक निराळी, निमसडे, मंडळ अधिकारी संतोष सुरवसे पुळुज, गणेश साठे भाळवणी आदीसह तलाठी, ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या जिल्हाध्यक्षपदी दयानंद परिचारक, महिला जिल्हाध्यक्षपदी मृणाली शिंदे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : जिल्हा परिषद कर्मचारी युनियन जिल्हा शाखा सोलापूरच्या जिल्हाध्यक्षपदी कनिष्ठ प्रशासन अधिकारी दयानंद परिचारक यांची निवड करण्यात आली आहे. तर जिल्हा उपाध्यक्षपदी विशाल घोगरे कनिष्ठ सहायक व कार्याध्यक्षपदी शिवाजी राठोड कनिष्ठ सहायक तसेच महिला जिल्हाध्यक्षपदी विस्तार अधिकारी (सां) मृणालिनी शिंदे, उपाध्यक्ष श्रीमती सविता काळे परिचर व कार्याध्यक्षपदी स्वाती स्वामी विस्तार अधिकारी (शिक्षण) यांची जिल्हा कार्यकारणी बैठकीत एकमताने निवड करण्यात आली.



सदर निवडपुर्वी स्वर्गीय विवेक लिंगराज सहायक प्रशासन अधिकारी यांच्या फोटोचे पुजन करुन त्यांनी केलेल्या काम काजाबाबत गैरवोदगार काढण्यात आले.फोट पुजनानंतर महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे राज्यध्यक्ष बाबुराव पुजरवाड यांचे अध्यक्षतेखाली विसावा सभागृह येथे बैठक घेण्यात येऊन सदर बैठकीत ही निवड करण्यात आली. निवडीनंतर पुणे विभागीय संघटक डॉ एस. पी. माने यांनी त्यास मान्यता देऊन नुतन पदाधिकार्यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन सम्मानित केले उर्वरीत जिल्हा तालुका पदाधिकारी, कार्यकारणी विस्तार लवकरच अध्यक्ष, सचिव यांच्या नेतृत्वाखाली निवडले जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीस पतसंस्था क्र १ चे व्हाईस चेअरमन श्रीधर कलशेट्टी, माजी जिल्हाध्यक्ष तजमुल मुतवल्ली, जिल्हा शाखा पदाधिकारी विलास मसलकर, अजय भोसले, राकेश सोडी, संतोष शिंदे, चेतन वाघमारे, श्रीशैल देशमुख, रोहीत घुले,विक्रम शहा,लेखा संघटनेचे अध्यक्ष अनिल बिराजदार, राजगुरु, दत्ता घोडके, कटकधोंड,किरण लालबोंद्रे, मिस्त्री, योगेश हब्बु, योगेश खंडागळे, मठपती, म्हेत्रे, सचिन पवार, गुरव, अभिमन्यु कांबळे, नागेश कोमारी, माने पंढरपूर तालुक्याचे पदाधिकारी शहाजहान तांबोळी, महेश वैद्य, नितीन शिंदे, सतीश ऊनवणे पाटील, कमलेश खाडे, तसेच महिला प्रतिनिधी निर्मला राठोड ,गोदावरी राठोड,आरती माढेकर, राजगुरु मॅडम, व इतर कार्यकारणी सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

निवडी नंतर नूतन जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांनी निःपक्ष, निःस्वार्थ, निर्भिड पणे सर्व कर्मचारी यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करण्यात येईल तसेच कर्मचाऱ्यांचे हक्क व आत्मसन्मान राखण्यात येईल कै विवेकानंद लिंगराज यांच्या विचाराप्रमाणेच सर्वांचे सहकार्याने कामकाज करू सर्व कर्मचाऱ्यांच्या अडचणी प्रशासनामा समोर मांडू अन्याय झाल्यास प्रशासनाशी भांडू असे मनोगत व्यक्त केले

झिडके येथील वनजमिनीत राजकीय वरदहस्ताने 'महाल' उभा

उच्च न्यायालयाच्या आदेशाला वन विभागाची 'केराची टोपली'

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे/प्रतिनिधी : कायद्याचा धाक फक्त सर्वसामान्यांसाठीच उरला आहे का? असा संतप्त सवाल सध्या भिवंडीतील झिडके परिसरातून विचारला जात आहे. झिडके येथील राखीव फॉरेस्ट सर्व्हे नंबर ९१ मध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य कैलास जाधव यांनी उभारलेल्या अनधिकृत बंगल्यावर कारवाई करण्यास वन विभाग जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश आणि खुद्द वनमंत्र्यांच्या सूचनेनंतरही 'राजकीय वरदहस्तामुळे' ही कारवाई थंडावल्याची चर्चा आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान?

मिळालेल्या माहितीनुसार, राखीव वनक्षेत्रात नियम धाब्यावर बसवून हा आलिशान बंगला उभा करण्यात आला आहे. या अतिक्रमणाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाने निष्कासनाचे आदेश दिले होते. मात्र, प्रशासकीय यंत्रणेने न्यायालयाच्या या आदेशाला अक्षरशः केराची टोपली दाखवली आहे. केवळ कागदोपत्री घोडे नाचवून प्रत्यक्ष कारवाईपासून वन विभाग लांब पळताना दिसत आहे.

वनमंत्र्यांचे आदेश धाब्यावर; ३ दिवसांची मुदत संपली तरीही 'मौन'

या प्रकरणाची तक्रार थेट वनमंत्री गणेश नाईक यांच्यापर्यंत पोहोचली होती. त्यांनी आपल्या 'जनता दरबार' मधून या अनधिकृत बांधकामावर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश वन विभागाला दिले होते. त्यानुसार वन विभागाने ३ दिवसांत बांधकाम रिकामे करण्याची नोटीस बजावली खरी, मात्र मुदत संपून अनेक दिवस उलटले तरी बंगला 'जैसे थे' आहे.

ग्रामपंचायत सदस्य कविता जाधव यांचे सदस्यत्व धोक्यात?

या प्रकरणात एक नवा पेच निर्माण झाला आहे. वन जमिनीतील या अनधिकृत बांधकामाला ग्रामपंचायतीने परवानगी कशी दिली? हा मोठा प्रश्न आहे. या अनधिकृत बांधकाम प्रकरणी ग्रामपंचायत सदस्या कविता जाधव यांच्या सदस्यत्वावर आता टांगती तलवार आली आहे.

सरकारी जागेवर अतिक्रमण किंवा त्याला खतपाणी घालणे या कारणास्तव त्यांचे पद रद्द होण्याची शक्यता कायदेतज्ज्ञांकडून वर्तवली जात आहे.

फॉरेस्ट अधिकारी रक्ताटे यांची भूमिका संशयास्पद

या संपूर्ण प्रकरणात वन अधिकारी रक्ताटे यांची भूमिका संशयास्पद मानली जात आहे. नोटिसा बजावूनही प्रत्यक्षात तोडकाम का केले जात नाही? अधिकारी कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत? असे प्रश्न नागरिक विचारत आहेत.

या संदर्भात रक्ताटे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही, ज्यामुळे संशयाची सुई अधिक गडद झाली आहे.

जिल्हा परिषद सदस्यांचे 'गुरचरण' जागेवरही अतिक्रमण

केवळ वन जमीनच नाही, तर यापूर्वी भिवंडी तहसीलदारांनी कैलास जाधव यांच्या गुरचरण (गायरान) जमिनीतील अतिक्रमणावरही तोडक कारवाईची नोटीस काढली होती. मात्र, तिथेही राजकीय शक्तीचा वापर करून कारवाई शून्य करण्यात आली. राजकारण्यांसाठी वेगळा न्याय आणि सामान्यांसाठी वेगळा न्याय, अशी परिस्थिती सध्या भिवंडीत पाहायला मिळत आहे.

प्रशासनाने जर लवकरात लवकर उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही, तर याविरोधात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा स्थानिक रहिवाशांनी दिला आहे.

नुतन जिल्हा निरिक्षक यांची ऑनलाईन मिटींग

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांचे वतीने सर्व नुतन जिल्हा निरिक्षक यांची ऑनलाईन मिटींग राष्ट्रवादी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आपले प्रेरणास्थान आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब, खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष माननीय आमदार श्री शशिकांत शिंदे साहेब, आमदार रोहित दादा पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. या प्रसंगी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील पक्ष निरीक्षक ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे साहेब यांनी पक्ष निरीक्षक यांचेशी संवाद साधताना सांगितले की, पक्षाचे निरीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडताना सर्वांना विश्वासात घेऊन गाव पातळीवर कार्य करणाऱ्या पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांची यांचा आढावा घेण्यात यावा. पक्ष वाढीसाठी व बळकटीसाठी काम करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांना प्राधान्याने संधी देण्यात यावी तसेच सर्वसामान्य जनतेपर्यंत आपल्या पक्षाची ध्येय धोरणे पोहोच करावी असे सांगितले.

याप्रसंगी नागेश दादा फाटे यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, पक्षाने माझ्यावर दिलेली जाबदारी प्रामाणीक पणे पार पाडीन तसेच पक्ष मजबुतीसाठी स्थानिक पातळीवरील ज्येष्ठ पदाधिकारी यांना विश्वासात घेऊन पक्ष संघटना बळकटीवर भर देवून पक्षाचे ध्येय धोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोच करुन पक्षवाढीसाठी कटीबध्द राहू असे फाटे यांनी सांगीतले.

भाळवणीत जागतिक ग्राहक दिन साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्र येथे जागतिक ग्राहक दिनानिमित्त अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सदस्य विजय शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्राहक पंचायतीचे प्रांत सदस्य विनोद भरते व ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास हे होते.

यावेळी उपसरपंच नितीन शिंदे, आरोग्य अधिकारी डॉ. निशा रोकडे, ग्राहक पंचायतीचे तालुका सदस्य शहाजी जाधव, प्रकाश माळी, राम कलढोणे,दीपक शेंडगे,पवन बोधे ,हणमंत गायकवाड,इ. उपस्थित होते.

यावेळी विजय शिंदे म्हणाले की, ग्रामीण भागात ग्राहक पंचायतीचे कार्य सुरू झाल्यामुळे ग्राहकांना आपल्या तक्रारी ,प्रश्न, समस्या सोडविण्याकरिता कायम मदत होणार आहे.शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. चांगल्या वैद्यकीय सेवा मिळत नाहीत. ग्राहकांना अडचणी आल्यास काय करायचे असे प्रश्न नेहमी पडतात. त्यामुळे ग्राहक जागृती करण्यासाठी अशा कार्यक्रमात सर्वांनी सहभागी झाले पाहिजे असे आवाहन विजय शिंदे यांनी केले.

ग्राहक पंचायतीचे प्रांत सदस्य विनोद भरते म्हणाले की, बाजारपेठेत गेले की आपण ग्राहक होतो. ग्राहक झालो की सेवा आणि मालाची खरेदी करतो. अशा सर्व ठिकाणी आपण ग्राहक होतो. ज्यावेळी आपली फसवणूक होते. त्यावेळी ग्राहकांना कुठे तक्रार करायची हेच समजत नाही. त्यासाठी ग्राहक पंचायत अशा कार्यक्रमातून प्रबोधन करते. असे प्रश्न ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून प्रश्न सोडवले जातात.त्याकरिता ग्राहकानी आपले कर्तव्य म्हणून पावती घेणे फार गरजेचे आहे. तरच हा प्रश्न तात्काळ सोडवला जातो असेही भरते यांनी सांगितले.

प्रारंभी ग्राहक पंचायतीचे आराध्य दैवत स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शशिकांत हरिदास यांनी ग्राहक चळवळ,अखिल भारतीय ग्राहक पंचायत या संघटनेच्या स्थापनेपासून, तसेच ग्राहक संरक्षण कायदा मंजुरी पर्यंतची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका उपाध्यक्ष प्रशांत माळवदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सदस्य शशिकांत देशपांडे यांनी मानले. यावेळी आशा वर्कर्स, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किनगावराजा मध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान

■ उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार अजित दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांचे झाले समाधान

■ अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाचे महत्वकांक्षी असलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान ' राबविण्यासाठी सिंदखेडराजा प्रशासन सज्ज होते उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार अजित दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली हे सर्व अभियान यशस्वीपणे पार पाडत आहेत, आज याच शिबिराच्या निमित्ताने किनगावराजा मंडळकरिता अभियान राबविण्यात आले आहे.

आजच्या या समाधान शिबिरासाठी पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजच्या या शिबिराम ध्ये तहसील कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय , महिला व बालविकास विभाग,आरोग्य विभाग, पशु संवर्धन विभाग, सहकारी संस्था, कृषी विभाग, पशु संवर्धन विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय, वन विभाग, महाराष्ट्र विद्युत वितरण मंडळ,पंचायत समिती इत्यादि शासनाच्या विविध विभागाच्या देण्यात येणाऱ्या सेवा उपलब्ध करण्यात आल्या.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाची (टप्पा क्र. १) प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

१. लोकाभिमुख आणि गतिमान प्रशासन

२.डिजिटल सेवांचा प्रसार आणि वापर

महाभूमी पोर्टल: ई-फेरफार, ई-मोजणी, ई-चावडी आणि ई-रेकॉर्ड्स यांसारख्या डिजिटल सेवांचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले जाईल.

३.डिजिटल ७/१२: क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ उताऱ्याला पूर्ण कायदेशीर वैधता प्राप्त झाली असून, आता तहसील कार्यालयात जाण्याची गरज नाही, याबाबत जनजागृती केली जाईल.

ई-मोजणी २.० : मोजणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरून घेण्याबाबत मार्गदर्शन केले जाईल.

३.जमिनीशी संबंधित महत्त्वाचे फेरफार आणि दुरुस्ती

अभिलेख दुरुस्ती : ७/१२ मधील चुका दुरुस्त करण्यासाठी 'मदत कक्ष' (क्शश्र ऊशीज्ञ) स्थापन केला जाईल.

प्रलंबित फेरफार : नगर भूमापन आणि गावठाण भूमापनाशी संबंधित प्रलंबित फेरफार प्रकरणे शिबिरातच निकाली काढली जातील.

कमी-जास्त पत्रके: भूसंपादन किंवा अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणांमध्ये प्रलंबित असलेली कमी-जास्त पत्रके तयार करून रेकॉर्ड अद्ययावत केले जाईल.

४. महसूल कायद्यातील सुधारणांची माहिती

अकृषिक (छ) परवानगी

तुकडेबंदी कायदा

५. एक खिडकी योजना (ड्ळपसश्रश थळपवु उश्रशरीरपलश)

६. सामाजिक लाभ आणि विद्यार्थी साहाय्य

दाखले वाटप, अर्थसहाय्य योजना

कृषी विभागामार्फत ट्रॅक्टर वाटप करण्यात आले आहेत.

आजच्या या अभियानाला माजी आमदार तोताराम कायंदे, तहसीलदार अजित दिवटे, नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे, कृषी अधिकारी भुते,पुरवठा निरीक्षक फाळे, सहायक पोलीस निरीक्षक मातोंडकर, भूमी अभिलेख मुख्यालय सहायक मारोती थोरवे, गोपाल वाघमारे, राजाराम चोखट, प्रकाश शिंदे, श्रीकांत बुलबुले, आयुष नायगावकर, मंडळ अधिकारी संतोष गायकवाड साहेब, ग्राम महसूल अधिकारी विष्णु थोरात, श्रीमंत पांडव, प्रविण झिने, शिवानंद सनाप, ब्रम्हदेव साळवे, रामकृष्णन जाधव, साहिल देशमुख तसेच महसूल सेवक विठ्ठल घोंगे, ज्ञानेश्वर ढाकणे, रमा म्हस्के, कोमल ताठे, महसूल सहाय्यक मनोहर चके, ज्योती बारवाल, श्रीकृष्ण शिंगणे, इंगोले साहेब, संजय सोनुने,तसेच पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच इत्यादी उपस्थित होते.

माणुसकी फांऊडेशनने राष्ट्रपुरुषांच्या विचारांचा जागर केला-भुजबळ

वनसगांवला 'शिवशाहीरी पोवाडां'च्या माध्यमातून सामाजिक एकोप्याचे दर्शन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती चे औचित्य साधत माणुसकी सामाजिक फांऊडेशन चे संस्थापक सागर निकाळे व आरती निकाळे यांच्या वतिने स्वप्निल डुंबरे (सिन्नरकर) यांचा शिवशाहीरी पोवाडा' गाथा शौर्याची शिव व शंभुची या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी जिल्हा परीषद शाळा वनसगांव येथिल विध्यार्थांनी नृत्य सादर करत उपस्थितांचे मने जिंकली कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.सेफालीताई भुजबळ उपस्थितीत होत्या ,याप्रसंगी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले असुन आलेल्या मान्यंवरांचे स्वागत आरती निकाळे यांनी केले

या कार्यक्रमात शिवशाहीर स्वप्नील डुंबरे यांनी आपल्या पहाडी आवाजात आणि ओघवत्या शैलीत छत्रपती शिवाजी महाराज तसेच थोर समाजसुधारकांचा गौरवशाली इतिहास प्रेक्षकांसमोर मांडला. शिवशाहीरीच्या या सादरीकरणाला उपस्थित ग्रामस्थांनी उत्स्फूर्त दाद दिली जय भवानी जय शिवाजी च्या घोषणांनी वातावरण दणाणुन सोडले तसेच 'शिवशाहीरी पोवाडा' या विशेष कार्यक्रमाचे यशस्वी करण्यासाठी निकाळे परीवार व वनसगांव पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले

स्वेरीच्या प्राध्यापकांनी दिली पाबळच्या विज्ञान संकुलास भेट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस)च्या चार प्राध्यापकांनी पाबळ (ता. शिरूर, जि.पुणे) येथे प्रसिद्ध असलेल्या 'विज्ञान आश्रमा'ला भेट देवून तेथील नवनवीन संशोधन व विज्ञानाची माहिती घेतली. प्राध्यापकांच्या या भेटीचा फायदा स्वेरीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे हे मात्र निश्चित!

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, संशोधन अधिष्ठाता डॉ. एम.एस.अभिषेक व डॉ.एच.बी. रोंगे यांनी पाबळच्या विज्ञान आश्रमाची माहिती जाणून घेतली. संशोधन विभागाच्या दृष्टीने सदर माहिती महत्वाची आहे. ग्रामीण समुदायांच्या गरजांसाठी बनविलेला हा आश्रम आहे. या केंद्राचे ध्येय 'ग्रामीण विकासाद्वारे तांत्रिक शिक्षण आणि त्या शिक्षणाद्वारे शाश्वत, मानव-केंद्रित ग्राम विकास' हे आहे. गेल्या चाळीस वर्षांत या विज्ञान आश्रमाच्या माध्यमातून तांत्रिक शिक्षणात नाविन्यपूर्ण प्रयोग केले गेले आहेत. या प्रयत्नांद्वारे शेकडो ग्रामीण तरुण आणि तरुणींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सक्षम केले, त्यांचा आत्मविश्वास वाढवला आणि नाविन्यपूर्णतेची भावना देखील जोपासली. त्यापैकी काहीजण यशस्वी ग्रामीण उद्योजक होवून त्यांनी स्थानिक समस्या सोडवल्या आहेत. शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक आव्हानांना तोंड देण्यासाठी वचनबद्ध असलेल्या या पाबळला स्वेरीच्या प्राध्यापकांनी भेट देवून सविस्तर माहिती जाणून घेतली. पाबळच्या विज्ञान आश्रमात तेथील संचालक डॉ. योगेश कुलकर्णी यांनी स्वेरीच्या प्राध्यापकांचे स्वागत करून विज्ञान आश्रमाची माहिती दिली. विज्ञान आश्रम हे नवनवीन कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी चालना देते. या विज्ञान आश्रमाच्या माध्यमातून विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फॅब्रिकेशन लॅबचे प्रात्यक्षिक दिले जाते. याची संपूर्ण माहिती स्वेरीमधील प्राध्यापकांनी घेतली. सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालकांनी या सहभागी प्राध्यापकांचे अभिनंदन करून त्यांच्या संशोधन वृत्तीचे कौतुक केले आहे.